Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION


# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019 Special Issue- 90 (B)

# महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता



मुख्य संपादक :

डॉ. धनराज धनगर

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2019 Special Issue – 90 (B)

## महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi),**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] India**

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 700/-

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | भारतातील मुस्लीम समाजातील दारिद्र्याची स्थिती | डॉ. वैशाली पाटील, शाईन शेख | 112 |
| 27 | १९९१ नंतर औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल | डॉ. डी. एम. चव्हाण | 115 |
| 28 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ | प्रा. सत्यम सानप | 119 |
| 29 | महाराष्ट्राच्या मानव विकासातील प्रादेशिक असमतोल | प्रा. अमोल पगार | 122 |
| 30 | महाराष्ट्रातील ग्रामीण विकासात कृषी पर्यटनाची भूमिका | डॉ. क्रांती बोरावके | 125 |
| 31 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ | डॉ. अशोक ससाणे | 130 |
| 32 | वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनांचा अभ्यास | डॉ. अनंत राठोड | 133 |
| 33 | महाराष्ट्रातील समतेसाठी दलित पँथरने केलेला संघर्ष | प्रा. जळबा नरवाडे | 139 |
| 34 | मध्ययुगीन महाराष्ट्रातील ग्रामरचना : विशेष संदर्भ 'बलुतेदार' | श्री किरण पवार | 142 |
| 35 | शिवकालीन महाराष्ट्रातील ग्रामजीवन | डॉ. ओमशिवा लिगाडे | 145 |
| 36 | मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ – एक चिकित्सक अभ्यास | प्रा. प्रेमचंद गायकवाड | 148 |
| 37 | र.धों.कर्वेंची शिक्षणासंदर्भात भूमिका – एक चिकित्सक अभ्यास | डॉ. सुभाष बेंजलवार | 153 |
| 38 | महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समता संघर्ष | प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, डॉ. महादेव गव्हाणे | 156 |
| 39 | मारंगखेडा यात्रा ऐतिहासिक वारसा -एक अभ्यास | गोरख बाघ | 160 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळ | किशोर सूर्यवाड | 163 |
| 41 | महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांचे योगदान | डॉ. किसान पालके | 166 |
| 42 | महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळ : एक अभ्यास | प्रा. सहदेव रोडे | 168 |
| 43 | १८१८ चे सत्तांतर केवळ राजकीय नसून आर्थिक बदलांची सुरुवात : विशेषतः शेतकऱ्यांतर्गत परिणाम | गणेश भामे | 173 |
| 44 | ब्राह्मणेतर स्त्री सुधारणा चळवळीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान -एक अभ्यास | प्रा. सहदेव रोडे, डॉ. किसान पालके | 177 |
| 45 | विदर्भाचे प्रादेशिक मागासलेपण आणि मानवी हक्काचा प्रश्न | डॉ. नंदकिशोर उगले | 181 |
| 46 | महाराष्ट्रातील उपप्रदेशवाद | डॉ. पंडित नलावडे | 185 |
| 47 | मराठा समाज : सामाजिक, राजकीय विश्लेषण | डॉ. आर. बी. वनारसे | 189 |
| 48 | बुलढाणा जिल्ह्यातील शहरीकरणाचा विकासक्रम : भौगोलिक अध्ययन | प्रा. अमोल भुयार, डॉ. विजय खराते | 196 |
| 49 | महाराष्ट्रातील इमारत व इतर बांधकाम कामगार आणि कामगार चळवळीची गरज : एक अभ्यास | अनिल झेंडे, डॉ.व्ही.ए.पाटील | 200 |
| 50 | महाराष्ट्रातील प्लास्टिक बंदी व पर्यावरणाचा असमतोल | डॉ. विजय गोरडे, प्रा. रवी रणदिवे, प्रा. पराग मेश्राम | 206 |
| 51 | महाराष्ट्रातील आर्थिक धोरणानंतरच्या कृषी अर्थसहाय्याच्या स्वरूपाचे विश्लेषण | डॉ. वासुदेव उईके | 211 |
| 52 | महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशनरी चळवळीत स्त्रियांची भूमिका | विश्वास वळवी | 215 |
| 53 | भूमी उपयोजन कार्यक्षमतेचा भौगोलिक अभ्यास – नंदुरबार जिल्हा | राजेंद्र पवार, विजय खराते | 220 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal ISSN : 2348-71..
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता January-20..
UGC Approved Journal

# महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समता संघर्ष

प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे
राजर्षी शाहू महाविद्यालय,
(स्वायत्त) लातूर
मो.नं. ९०९६३५९५२९
Mail : bansode9529@gmail.com
डॉ. महादेव गव्हाणे
राजर्षी शाहू महाविद्यालय,
Mail :
gavhane.mahadev@rediffmail.com
मो.नं. ९४०३२४५६५०

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात समतेचा पुरस्कार एक राजकीय ध्येय म्हणून होऊ लागला आहे. सर्वसाधा... समतेचा अर्थ समाजातील सर्व नागरिकांना समान मानून त्यांना समान वागणूक, समान दर्जा, समान अ... असा केला जातो. समतेचा हा अधिकार नैसर्गिक असुन तो जन्मत: प्राप्त होतो. फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेने मा... अधिकाराची जी घोषणा केली त्यात मानवास स्वातंत्र्य आणि समतेचा नैसर्गीक हक्क असतो. हे मान्य के... आहे. प्रत्येक मनुष्य जन्मत: स्वतंत्र असतो. प्रत्येकास स्वातंत्रता आणि समतेचा अधिकार असतो असे फ्रान्स... राष्ट्रीय सभेने केलेल्या मानवी अधिकारांच्या घोषणेत म्हटलं आहे.[1] समता हे मानवाच्या उन्नत अवस्थे... मुलभूत मूल्य आहे. १७७६ मध्ये अमेरिकन राज्यक्रांतीच्या शिल्पकाराने निर्मिल्याने सर्व मानसांना समान नि... असून त्या सर्वांना कांही अदेय स्वरूपाने अधिकार बहाल केले आहेत अशी घोषणा करणारा स्वातं... जाहिरनामा प्रसिध्द केला.[2] यावरून मानवात समता ही नैसर्गीक असून ती स्वयंसिध्द असते असे प्रतिपादन ... जाते.

**स्त्री–पुरूष समतेची संकल्पना :**

समतेची संकल्पना आज जगभर स्वीकारण्यात आली असुन सर्वच देश त्यांच्या कायदा... संकल्पनेचा समावेश करत आहेत. जगातील सर्वच धर्म आणि पंथामध्ये समतेचा पुरस्कार करण्यात ... असाल तरी आपल्या समाजात असमानता अनुभवावयास मिळते हे सत्य आहे. आजही स्त्री–पुरू... विषमता आढळून येते. स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबर अधिकार नसतात पण मानवी जीवनाच्या प्राथमिक अ... म्हणजेच निसर्गावस्थेत पुरूष व स्त्री समान स्वरूपात आपले जीवन जगत होते. सामाजिक करारवादी वि... जीवडं भ्वइइमे यांनी आपल्या 'समअपंजींद'या ग्रंथात स्पष्ट केलेली निसर्गावस्था किंवा श्रवीद स्वकन ... आपल्या श्ज्व जतमंजपमे वद बपअपस ळवअमतदउमदजश या ग्रंथात आणि त्वनेमंन यांनी आपल्या '... ब्वदजतंवज'या ग्रंथात सामाजिक करार होण्यापूर्वी जी निसर्गावस्था स्पष्ट केली आहे. त्यात कोठेही स्त्री–... यांच्यात लिंग–भेद होता असे म्हटले नाही. तसेच कार्ल–मार्क्सने इतिहासाची भौतिक मीमांसा करताना ... अवस्थेत कोणतीच वर्गीय भावना अस्तित्वात नसल्याने मत मांडले.[3] यावरून निसर्गावस्थेत किंवा ... इतिहासाच्या प्राथमिक अवस्थेत लिंगीय भेदाची भावना किंवा वर्गीय भावनेवरून स्त्री–पुरूष यांच्यात भेद ... जात नव्हता. म्हणजेच स्त्री–पुरूष यांच्यात समता होती. स्त्री–पुरूष यांच्यात समता असेल तरच देशाचा वि... होतो. स्त्री–पुरूष हे राष्ट्राच्या विकासरथाची दोन चाके आहेत.

**महाराष्ट्रातील प्राचीन मध्ययुगीन कालखंडातील स्त्रीयांची स्थिती :**

स्त्रीयांना ज्या समाजात समानतेचा, सन्मानाचा व प्रतिष्ठेचा दर्जा व स्थान असते तो समाज सु... समजला जातो. भारतीय संस्कृतमध्ये स्त्रीची माता, भगिनी, पत्नी, कन्या अशी विविध रुपे असली तरी ...

पुरुषी मनुने सांगितलेले सुत्र आहे. 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती!'४ म्हणूनच स्त्री यापैकी कोणत्याही रूपामध्ये असली तरी तिला स्वातंत्र्य नाही. हजारो वर्षापासून अस्तित्वात असलेल्या पुरूषसत्ताक पध्दतीमुळे स्त्रीवरील बंधने अधिकच घट झाली आणि समाजाच्या दृष्टीकोणातून स्त्री ही पुरूषाची दासी झाली. मनुस्मृतीत मनुने स्त्रीविषयी मत मांडताना असे म्हटले की,

पिता रक्षति कौमार्ये भर्ता रक्षति यौवने।
पुत्रो रक्षति वार्धक्ये न स्त्री स्वातंत्र मर्हती।।५

याचा अर्थ असा की, स्त्रीचे रक्षण कुमार अवस्थेत पित्याने, तरूणपणी पतीने तर म्हातारपणी पुत्राने करावे असे तो म्हणतो. म्हणजे स्त्रीला कसलेच स्वातंत्र्य नाही. मनुने स्त्रियांच्या स्वातंत्र्याला दिलेला नकार महिलांच्या विकासातील मोठा अडथळा ठरला आहे. कारण मनुच्या स्मृतीप्रमाणे भारतीय समाजात स्त्रियांना स्वातंत्र्याचा अधिकार नाही ही मानसिकता रुढ झाली. यामुळे स्त्रीचे माणूसपण नाकारले गेले आणि तिला पशुतुल्य जीवन प्राप्त झाले. यातूनच समाजाच्या कोणत्याही रुढीचा, परंपरेचा पहिला बळी स्त्रीच पडू लागली. धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक बंधने केवळ स्त्रीच्या वाट्यालाच आली आणि व्यक्तिविकासाच्या तिच्या वाटा पूर्णपणे बंद झाल्या.

बलविवाह, सतीप्रथा, विधवा पुनर्विवाहास बंदी, केशवपण अशा विविध अमानुष व क्रूर प्रथा रुढ झाल्या होत्या. स्त्रीयांनी पडद्यात रहावे, पुरूषावरोबर येऊ नये, मोठ्याने हसू नये अशी बंधने स्त्रीयांवर होती. परंपरागत विचार, चाकोरीबध्द वागणूक पूर्वापार चालत आलेल्या कुटुंबरचनेत सामाजिक पथ्ये व नैतिकतेच्या कल्पना या सोयीस्करपणे स्त्रीपुरत्याच मर्यादित ठेवण्यात आल्या. स्त्रीला यामध्ये पुरती जखडून ठेवण्यात आले. मात्र पुरूष या सर्वांतून पूर्णपणे अलिप्त राहिला. सर्व प्रकारचे अधिकार पुरूषालाच प्राप्त झाले. त्यामुळे ज्ञानार्जनासारख्या महत्त्वपुर्ण हक्कापासून स्त्री वंचित राहिली मात्र पुरुषाला सर्व प्रकारच्या ज्ञानप्राप्तीचे मार्ग खुले झाले. यामुळे अगदी एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्रीकडे दासी, गुलाम, भोगवस्तू म्हणूनच पाहिले जात होते.

### महात्मा फुलेंचे स्त्री–पुरूष समतेचे विचार व कार्य :

महाराष्ट्रात महात्मा फुलेंच्या काळात स्त्रीयांची समाजातील स्थिती अतिशय वाईट होती. सामाजिक समतेसाठी जातीभेद आणि स्पृश्यास्पृश्यतेइतकेच महत्त्व महात्मा फुलेंनी स्त्रीयांच्या प्रश्नांना दिले. कारण स्त्री देखील समाजाचा एक स्वतंत्र घटक असते. समाजाचे व्यक्तिमत्व विकसित होण्यासाठी स्त्रीयांना समाजात स्थान असावे लागते. त्यामुळे स्त्री–पुरूष असा भेद न करता समतेचे तत्त्व व्यवहारात आणावे असे त्यांचे मत होते. समाजात स्त्रियांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असावे. स्त्री खऱ्या अर्थाने समाजाची संरक्षक असते. स्त्रीला दुर्बल समजू नये कारण स्त्रियांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाले तर समाजाकडे दुर्लक्ष होते. एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. कुटुंबावर संस्कार करण्याचे कार्य स्त्री करते.

महात्मा फुलेंच्या काळात स्त्रीयांच्या बाबतीत अनेक प्रथा रुढ होत्या. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. तिचे कार्य हे चार भिंतीच्या आतच होते. स्त्रीयांवर अनेक बंधने होती. बालविवाह, विधवा विवाहास मान्यता नव्हती. विधवांना पतीच्या निधनानंतर एकतर सती जावे लागे अन्यथा वाईट अवस्थेत जीवन जगावे लागत असे. जरठ कुमारी विवाह, केशवपण अशा वाईट प्रथांमुळे स्त्रियांची स्थितीही अतिशय वाईट होती. अशा अवस्थेत केवळ महात्मा फुलेंनाच स्त्रियांबद्दल कळकळ निर्माण झाली. स्त्री ही समाजाचे मुळ आहे. म्हणून त्यांनी स्त्रियांच्या उध्दाराचे व त्यांचे दु:ख निवारण्याचे कार्य केले. महात्मा फुलेंनी स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी शिक्षण हाच मार्ग असल्याचे मत मांडले. स्त्री–शिक्षणाकडे फुले यांनी सामाजिक परिवर्तनाचे हत्यार म्हणून पाहिले. १८४८ मध्ये पुणे येथे बुधवारपेठेत असलेल्या तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली.६ त्यांनी आपल्या कार्यात उच्चवर्णीय किंवा बहुजनसमाजातील स्त्रीयांसाठी असा विचार न करता स्त्री या घटकाचाच विचार केला. म्हणून शुद्रातिशुद्रातील स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी महात्मा फुले यांनी सुरू केलेली ही शाळा देशातील पहिलीच शाळा ठरते. त्यामुळे महात्मा फुले हे देशातील स्त्री शिक्षणाचे जनक ठरतात.

स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी महात्मा फुलेंनी विधवा पुनर्विवाहाचा प्रश्न हा त्या काळी मोठा विचा प्रश्न होता. समाजातील विधवा स्त्रियांना भोगावा लागणारा छळ मानवतेला काळीमा फासणारा आहे असे त्यांचे मत होते. स्त्रियांवरील हा अन्याय दूर होण्यासाठी समाजात पुनर्विवाहाची प्रथा रूढ झाली पाहिजे. यासाठी त्यांनी चळवळ सुरू केली. ८ मार्च १८६४ रोजी पुण्यात गोखल्यांच्या बागेत एक पुनर्विवाह घडवून आणला, हा पहिला पुनर्विवाह होय. विधवा पुनर्विवाहाचे समर्थन करताना ते म्हणतात की, ''बहु स्त्रियांचा पती। स्त्रीस का उलटी रिती।''[3] असा प्रश्न केला. याशिवाय विधवांच्या केशवपणासाठी विरोध केला. थोडक्यात स्त्री–पुरुष विषमता जातींच्या उतरंडीशी जोडून स्त्रियांचा प्रश्न एकूण समाजपरिवर्तनाचा अंगभूत भाग मानण्याचे श्रेय फुले यांचे आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री–पुरूष समतेचे विचार कार्य :**

डॉ. बाबासाहेब अंबेडकरांनी स्त्रीयांना समाजात समान दर्जा आणि चांगली वागणूक मिळाली पाहिजे असा विचार मांडला. त्यांनी स्त्रियांना सामाजिक समतेच्या लढ्यात सहभागी करून घेऊन त्यांच्यात आत्मसन्मान, स्वप्रतिष्ठा आणि मानवी हक्क मिळवण्याची चेतना तर निर्माण केलीच शिवाय संपुर्ण स्त्री जातीला गुलाम बनविणाऱ्या मनुस्मृतीचे दहन त्यांनी केले. स्त्रियांच्या शोचनीय स्थितीस त्यांनी मनूस जबाबदार धरले. डॉ. आंबेडकर १९२९ साली स्त्रीयांच्या सभेत भाषण देताना म्हणाले होते की, ''आता तुम्ही अजियात कथलाचे दागिने घालायचे नाहीत. दागिने घालायचे तर ते सोन्या–चांदीचे घाला. प्रेतावर पांघरलेल्या कापडाचीच वस्त्रे पेहरण्याचा नियम झुगारून द्या. दलित बाईने दंड घातलेलीच साडी, तिचा काठ वाण्याबामणाच्या बाईसारखा दिसला नाही पाहिजे. अशी का म्हणून नेसायची? पड ओढू नका, महारकीची, तराळकीची कामं सोडून द्या. जनावरासारखे जगणे सोडून द्या नि माणसासारखे जगायला शिका. चांगले जगणे हा तुमचा अधिकार आहे.''[4] या त्यांच्या विचारावरून स्त्रीयांमध्ये जागृती निर्माण झाली. स्त्रीयांना शिक्षण प्राप्त झाल्यास कुटुंबाचा विकास होईल. स्त्रीयांच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्री शिक्षणावर त्यांनी भर दिला. शिक्षणामुळे स्त्रीयांना त्यांच्या हक्काची जाणीव होईल असे त्यांचे मत होते.

भारतीय संविधान निर्मितीप्रसंगी स्त्री–पुरूष समतेचा विचार त्यांनी संविधान समाविष्ट केला. कायदामंत्री असताना हिंदू स्त्रियांना अनेक अधिकार प्रदान करणारे 'हिंदू कोड बील' तयार केले. यामुळे स्त्रियांच्या समस्यांना एका अर्थाने खरी वाचा फोडली गेली. स्त्रियांना समाजात योग्य स्थान प्राप्त व्हावे, त्यांच्यावर होणारा अन्याय थांबावा यासाठी डॉ. आंबेडकरांनी सर्व पातळीवर संघर्ष केला. समाजाचा विकास हा स्त्रियांच्या विकासाने समजला जावा. स्त्रियांचा विकास हाच समाजाच्या विकासाची पुर्वअट आहे असे डॉ. आंबेडकर म्हणत.

**महाराष्ट्रातील इतर विचारवंताचे स्त्री–पुरूष समतेचे विचार व कार्य :**

महाराष्ट्रात १९ व्या शतकात खऱ्या अर्थाने स्त्री सुधारणेच्या कार्यास सुरूवात झाली. या काळात अनेक समाजसुधारकांनी स्त्री–पुरूष समतेचे विचार मांडले. या उदारमतवादी समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळेच स्त्रियांना शिक्षणाची त्यांच्या हक्काची जाणीव झाली. १८८२ साली ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री–पुरूष : तुलना' नावाचा ग्रंथ लिहिला. यामध्ये स्त्रियांच्या बाबतीत असणाऱ्या सती, केशवपन, स्त्री शोषण या वाईट प्रथांचा प्रतिकार त्या करतात व विधवा पुनर्विवाह, स्त्री–पुरूष समतेचा जोरदार पुरस्कार त्या करतात. निसर्गत: स्त्री व पुरूष हे समान आहेत. तरीही स्त्रीला गुलाम बनविले असल्याचे वास्तव ताराबाई आपल्या ग्रंथात मांडतात. तत्कालीन समाजातील स्त्रियांच्या दुःखाचे विश्लेषण करताना ताराबाईंनी समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था, अर्थव्यवस्थेची चिकित्सा अतिशय परखडपणे केली आहे. पुरूषांबरोबर ईश्वरालाही ताराबाईंनी जाब विचारलेला आहे. ईश्वरही पुरूष असल्याकारणाने स्त्रियांना सर्वत्र बंदिस्त, गुलाम करून ठेवले आहे आणि पुरूषांना मात्र सर्वत्र मुक्त ठेवले आहे.[5] असे मत ताराबाई शिंदे आपल्या ग्रंथात मांडतात.

स्त्रियांच्या विकासासाठी ज्याप्रमाणे फुले दाम्पत्यांनी कार्य केले. त्याप्रमाणे रानडे दाम्पत्यांनीही स्त्रियांसाठी कार्य केले. न्या. रानडे यांनी सार्वजनिक सभेच्या द्वारे विवाहसंबंधीचे संमती वय निश्चित करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यामुळे मुलींचे होणारे बालविवाह कांही प्रमाणात रोखले गेले. न्या रानडे

पत्नी रमाबाई रानडे यांनीही स्त्रीसभा, आर्य महिला मंडळ, हिंदू लेडिज सोशल क्लब व पुण्यातील सेवासदन या संस्थामार्फत स्त्रीयांसाठी महत्त्वाचे कार्य केले. स्त्री–पुरूष समतेचे समर्थन करताना त्या असे म्हणतात की, "कुटुंबाप्रमाणे देशाचे कल्याण हे स्त्री–पुरूष या दोन्ही वर्गाच्या शहाणपणावर व एकविचारावर अवलंबून असते. स्त्रियांची आत्मविकासाची चळवळ म्हणजे पुरूषवर्गाशी संघर्ष नव्हे. स्त्री–पुरूषांनी आपआपल्या गुणांनुसार परिश्रम केले. तरच देशांच्या उन्नतीची आशा असते."[१०]

समारोप :

१९ व्या शतकातील उदारमतवादी समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे स्त्रियांना शिक्षणाची कवाडे खुली झाली. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली. त्यामुळे स्त्रियांमध्ये शिक्षणाविषयी जागृती निर्माण झाली. याबरोबरच ताराबाई शिंदे, न्या. महादेव गोविंद रानडे, पंडिता रमाबाई रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. समाजसुधारकांनी मानवतेच्या दृष्टीकोनातून स्त्रियांवरील होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. अमानुष रुढी, प्रथा परंपरा, चालीरिती यांना विरोध केला. त्यांच्या प्रयत्नातूनच स्त्री जागृतीची पहाट झाली.

संदर्भसूची :–

१. प्रा. पद्माकर सिध्दनाथ काणे, राज्यशास्त्र, विद्या प्रकाशन, रईकर मार्ग, नागपूर, १९७३, पृ. २४२.
२. डॉ. रावसाहेब कसबे (संपा.), समता (विचार / व्यवहार / भवितव्य) दादासाहेब रुपवते स्मृती ग्रंथ, दादासाहेब रुपवते फाऊंडेशन, मुंबई, २०००, पृ. ३.
३. डॉ. राजशेखर सोलापूरे(संपा.), महिला विकास प्रश्न–पैलू–प्रयास, अरुणा प्रकाशन, लातूर,२०१२,पृ ५.
४. दत्ता देसाई, जागतिकीकरणाच्या जमान्यात शाश्वत विकास, प्रबोधन प्रकाशन, ज्योती (मासिक), २००२, पृ. ४७.
५. डॉ. राजशेखर सोलापूरे, महिला विकास, पूर्वोक्त, पृ. ७.
६. डॉ. अनिल कठारे, डॉ. महादेव वाघमारे, डॉ. गौतम पाटील, महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ३५.
७. प्रा. किसन चोपडे, भारतीय विचारवंत, गोमटेश प्रकाशन, परभणी, १९९३, पृ. ६६
८. डॉ. राजशेखर सोलापूरे, डॉ. जयद्रथ जाधव (संपा.), परिवर्तनवादी चळवळी, (डॉ. विठ्ठल मोरे गौरव ग्रंथ), अरुणा प्रकाशन, लातूर, पृ. १२८.
९. डॉ. राजशेखर सोलापूरे (संपा.), शोधसंपदा, अंक २० वा, जुलै, २०१५, पृ.
१०.डॉ. राजशेखर सोलापूरे (संपा.), पूर्वोक्त.